
# यांनी घडविला समाज



लीला पाटील,
बाजीराव जठार-नाईक

परी प्रकाशन

यांनी घडविला समाज

◆ ——————

© सुरक्षित

◆ ——————

**प्रकाशक :**
**परी प्रकाशन**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

◆ ——————

**प्रमुख वितरक**
**अजब डिस्ट्रिब्युटर्स**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

**मुखपृष्ठ :**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

◆ ——————

**मुद्रक :**
जयंत प्रिंटरी

◆ ——————

**आवृत्ती :**
२९ ऑगस्ट, २०१३

◆ ——————

**किंमत :**
रुपये १२०/-

## अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| १. | साने गुरुजी | ३ |
| २. | राजर्षि शाहू छत्रपती | २० |
| ३. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर | ३७ |
| ४. | महात्मा जोतिबा फुले | ५३ |
| ५. | राजा राममोहन रॉय | ७० |
| ६. | विठ्ठल रामजी शिंदे | ८६ |
| ७. | सेनापती बापट | १०३ |
| ८. | क्रांतिसिंह नाना पाटील | १२० |
| ९. | भाई माधवराव बागल | १३७ |
| १०. | डॉ. ॲनी बेझंट | १५३ |

# साने गुरुजी



'करील मनोरंजन जो मुलांचे । जडेल नाते प्रभूशी तयाचे' असे म्हणणारे साने गुरुजी हे मुलांनो, सत्वसंपन्न साहित्यिक, पत्रकार, प्रबोधनकार, स्वातंत्र्याचा निष्ठावंत पाईक, भारतीय संस्कृतीचा प्रसारक आणि मानवतेचे उपासक होते.

मार्गशीर्ष वद्य सप्तमी शके १८२१ रविवार म्हणजेच २४ डिसेंबर १८९९ रोजी पालगड येथे श्यामचा जन्म झाला. घरीदारी त्याला पंढरी या नावानेच हाक मारीत. सदाशिव नारायणराव साने हे श्यामचे वडील. त्यांना भाऊराव म्हणत. ते वडवली गावचे खोत होते. त्यांचे पालगडमधीलच नारायण बल्लाळ परचुरे यांच्या मुलीशी लग्न झाले. तिला माहेरी आवडी किंवा बयो म्हणत. सासरचे नाव यशोदा. हीच श्यामची आई. भाऊराव व यशोदा यांना दोन मुली व पाच मुले अशी सात अपत्ये झाली. त्यापैकी श्याम हा चार नंबरचा. शाळेत जाण्यापूर्वीच श्यामच्या बालपणातील सारे दिवस आई-वडिलांच्या सहवासात आणि संस्कारात गेले.

मुलांनो, त्यांचा जीवनप्रवास अतिशय खडतर होता. पांडुरंग सदाशिव साने हे गुरुजींचे संपूर्ण नाव. लहानपणी घरात त्यांना पंढरीनाथ असे म्हणत. १९३२ साली धुळ्याच्या तुरुंगात असताना आपटे गुरुजी व इतरांनी त्यांना 'साने गुरुजी' म्हणून संबोधायला सुरुवात केली आणि हेच नाव पुढे रूढ झाले व खुद्द गुरुजींनाही 'साने गुरुजी' हे नावच अधिक आवडले.

पालगड जिल्हा रत्नागिरी येथे २४ डिसेंबर १८९९ रोजी साने गुरुजींचा जन्म झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षणाचा 'श्रीगणेशा' ११ फेब्रुवारी १९०५ रोजी पालगड येथील मराठी शाळेत नाव दाखल करून सुरू झाला. माध्यमिक शिक्षणासाठी दापोलीच्या 'मिशन' हायस्कूलमध्ये १० जून १९१२ रोजी नाव दाखल केले व पुढे औंध जि. सातारा येथील श्री यमाई श्रीनिवास विद्यालय आणि पुणे येथील नूतन मराठी विद्यालय या शाळांतून त्यांचे शिक्षण झाले.

आई माझा गुरू, आई कल्पतरू असे आईविषयी म्हणणाऱ्या साने गुरुजींच्या आईचे निधन २ नोव्हेंबर १९१७ रोजी झाले. मात्र साने गुरुजी व त्यांच्या आई यांची आईच्या मृत्यूपूर्वी भेट झाली

नाही. १९१८ साली साने गुरुजी मॅट्रिक परीक्षा पास झाले आणि १९१८ ते १९२२ या काळात 'न्यू पूना कॉलेजात प्रवेश घेऊन संस्कृत व मराठी हे दोन विषय घेऊन बी. ए. ची परीक्षा द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले.

साने गुरुजींनी महात्मा गांधींना प्रथम मुंबईत पाहिले व त्यांच्या भाषणाने राष्ट्रासाठी सर्वस्व अर्पण करण्याची ऊर्मी त्यांच्या अंगात आली आणि १९२१ पासून खादी वापरण्यास सुरुवात केली. १९२३ मध्ये ते अमळनेर येथील तत्त्वज्ञान मंदिरात तत्त्वज्ञानाचा अभ्यास करण्यासाठी दाखल झाले. त्याचवेळी विनायक मोरेश्वर केळकर इत्यादी काही मित्रांसोबत 'आत्मार्पण संघा'ची स्थापना केली. १९२३ च्या डिसेंबर महिन्यात त्यांनी तत्त्वज्ञान मंदिराला राम राम ठोकला व मराठी, इंग्रजी, संस्कृत हे विषय घेऊन ते १९२४ मध्ये एम. ए. झाले. १५ नोव्हेंबर १९२४ रोजी त्यांच्या वडिलांचे (सदाशिव नारायण साने) निधन झाले.

अमळनेर येथील खानदेश एज्युकेशन सोसायटीच्या हायस्कूलमध्ये १७ जून, १९२४ ते १९३० या कालावधीत त्यांनी शिक्षक म्हणून जे कार्य केले ते त्यांच्या पुढील जीवनाचा पाया ठरले, १९ फेब्रुवारी, १९२५ साली त्यांनी ना. गोपाळ कृष्ण गोखले यांचे चरित्र लिहिले. अमळनेरच्या शाळेत असताना गुरुजींनी 'छात्रालय' हे हस्तलिखित काढले. हे दैनिक गुरुजींनी जवळ–जवळ तीन वर्षे चालविले.

९ नोव्हेंबर १९२८ रोजी त्यांच्या 'विद्यार्थी' मासिकाचा पहिला अंक प्रसिद्ध झाला. २९ एप्रिल १९३० रोजी स्वातंत्र्य चळवळीत भाग घेण्यासाठी अमळनेरच्या शाळेचा निरोप घेतला आणि मे १९३० मध्ये ते खानदेशात सत्याग्रह व कायदेभंग चळवळीत उतरले. कायदेभंग चळवळीचा प्रचार करताना गुरुजींना १५ महिने कारावासाची शिक्षा ठोठावली व १९३० साली त्यांना धुळ्याच्या तुरुंगात ठेवले. त्यावेळी त्यांनी 'स्वातंत्र्याचे आम्ही शिपायी ! सुखवू प्रियतम भारतमयी' ही कविता आणि 'खरा सत्याग्रही' (अप्रकाशित) नाटक लिहिले. येथेच आचार्य विनोबा भावे यांच्याशी त्यांची पहिली भेट झाली. तेथून त्रिचनापलीच्या तुरुंगात त्यांची रवानगी झाली. तेथे गुरुजींनी 'कुरल' या तमिळ ग्रंथाचा अनुवाद केला. त्याबरोबरच 'सत्याग्रही' हे खंडकाव्य आणि इतरही कविता लिहिल्या. 'रामाचा शेला', 'ते आपले घर', 'ही खरी संस्कृती', 'सावित्री'ही नाटकेही लिहिली. कायदेभंगाच्या चळवळीत भाग घेऊन शिक्षा भोगल्याबद्दल पालगडच्या ग्रामस्थांनी 'पंढरी' चे कौतुक केले व ५१ रुपयांची थैली मोठ्या प्रेमाने दिली. पंढरीने ती गावकार्यासाठी ग्रामस्थांच्या हवाली केली.

२ ऑक्टोबर, १९३१ रोजी महात्मा गांधींना त्यांच्या वाढदिवशी एक कोटी वार सूत अर्पण करण्याचा संकल्प पूर्व खानदेश जिल्ह्याने केला होता. त्यात अमळनेर तालुका २० लाख वार सूत देईल, असे गुरुजींनी आश्वासन दिले व त्याची पूर्तताही केली.

अमळनेरच्या सभेनंतर गुरुजींना पुन्हा अटक होऊन दोन वर्षांची कारावासाची शिक्षा १७ जानेवारी १९३२ ला झाली व धुळे तुरुंगात त्यांची रवानगी झाली. येथे त्यांना विनोबांचा प्रदीर्घ सहवास घडला. धुळे तुरुंगात विनोबा दर रविवारी गीतेवर प्रवचने देत. गुरुजी ती प्रवचने ऐकत व रात्री शब्दश: लिहून काढत. त्यातून 'गीता प्रवचने' हे पुस्तक आकाराला आले. ही प्रवचने त्यावेळी खूप गाजली.

महात्मा गांधींच्या काही लेखांचाही अनुवाद गुरुजींनी या सुमारास केला. तेथून नाशिकच्या तुरुंगात त्यांची रवानगी झाली. येथे आपटे गुरुजींचा सहवास त्यांना मिळाला. या तुरुंगातच साने सरांचे 'साने गुरुजी' झाले. 'श्यामची आई', 'धडपडणारी मुले' या प्रसिद्ध पुस्तकांचे लेखनही त्यांनी या तुरुंगातच केले. 'दीनबंधू बाबू' ही बृहत्कथातही या कारावासातच त्यांनी लिहिली. पुढे ७ वर्षांनी तिच्यात बदल करून 'क्रांती' ही कादंबरी १९४० साली प्रसिद्ध झाली. नाशिकच्या तुरुंगात गुरुजींकडे चक्की पिसण्याचे काम होते. विनोबा, स्वामी आनंद यांचा सहवास, सत्याग्रहींशी चर्चा आणि उरलेल्या वेळात लेखन असा त्यांचा दिनक्रम व गजबज असूनही अधूनमधून गुरुजींच्या मनाला खिन्नता येई. त्यांना एकाकी वाटे, आणि मग अश्रू हाच त्यांचा आधार बने. तो कोणी हिरावून नेऊ नये असे त्यांना वाटे. अशा मन:स्थितीत मग,

'नको माझे अश्रू, कधी नेऊ देवा । हाचि थोर ठेवा, माझा एक ।। बाकी सारे नेई, धन-सुख मान । परी हे लोचन राखी आले ।।' यासारखी कविता ते लिहून जात.

२६ जानेवारी १९३४ रोजी साने गुरुजींनी वैयक्तिक सत्याग्रह केल्याबद्दल चाळीसगाव येथे अटक करण्यात आली व चार महिन्यांची शिक्षा झाली. यावेळी त्यांची रवानगी धुळे तुरुंगातच झाली. येथेच त्यांनी टॉलस्टॉयच्या 'कला म्हणजे काय ? या पुस्तकाचे भाषांतर केले. सुटकेनंतर पुण्यात असताना 'श्यामची आई' मधील शेवटच्या रात्री (क्र. ३७ ते ४५) त्यांनी पुण्यात लिहिल्या तसेच स्त्रीगीतांच्या संकलनाचे कार्यही सुरू केले.

नोव्हेंबर १९३४ मध्ये विनोबा भावे यांच्या सूचनेवरून खानदेशातील नावरा-नावरी आश्रमाचे प्रमुखपद त्यांना देणेत आले परंतु त्यातही मन न रमल्याने गुरुजींनी पुण्यास पलायन केले व १९३४-३५ या काळात पुण्यात शिक्षणासाठी राहिलेल्या खानदेशातील धडपडणाऱ्या विद्यार्थ्यांची ते आई होऊन राहिले.

ऑक्टोबर १९३७ मध्ये चाळीसगाव येथे भरलेल्या शेतकरी परिषदेचे त्यांनी अध्यक्षपद भूषविले. ६ एप्रिल १९३८ रोजी 'कॉंग्रेस' साप्ताहिक सुरू केले. हे भिक्षेवर चालविलेले पहिलेच वृत्तपत्र. परंतु याचा अखेरचा अंक १८ मार्च १९४० रोजी काढल्यानंतर साप्ताहिक बंद करण्यात आले. ८ एप्रिल १९३८ रोजी खानदेशातील गिरणी कामगारांचा लढा गुरुजींच्या नेतृत्वाखाली यशस्वी झाला. तसेच ५ सप्टेंबर १९७८ रोजी त्यांनी धुळे येथील गिरणी

कामगारांच्या लढ्याचे नेतृत्त्व केले. २० ऑक्टोबर १९३८ रोजी धुळे येथील 'न्यू प्रताप मिल' सुरू व्हावी म्हणून उपोषण केले. २७ डिसेंबर १९४० मध्ये चांदवड येथे आक्षेपार्ह भाषण केल्याचा आरोप ठेवून दोन वर्षांच्या कारावासांची शिक्षा झाली व त्यावेळी त्यांची धुळे तुरुंगात रवानगी झाली. येथे त्यांनी 'रामाचा शेला' ही कादंबरी लिहिली.

९ ऑगस्ट, १९४२ साली साने गुरुजींची धुळे तुरुंगातून रात्री १२ नंतर सुटका केली. सुटका होताच त्यांनी भूमिगत राहून सात-आठ महिने स्वातंत्र्य चळवळीचे प्रचारकार्य केले. १९४३ ते १९४५ या कालावधीतही शिक्षा होऊन गुरुजींना येरवडा तुरुंगात ठेवले. शेवटचे सहा महिने ते नाशिक तुरुंगात होते. स्वातंत्र्य चळवळीतील कार्य, सभा, दौरे यांची दगदग पाहता वेगवेगळ्या निमित्तांनी झालेला कारावास हा गुरुजींच्या वाङ्मय निर्मितीला पोषकच ठरला, असे म्हणावे लागले.

१९३० ते १९५० ही वीस वर्षे म्हणजे त्यांच्या राष्ट्रीय कार्यातील चढउतारांचा आलेखच आहे. विनोबा भावे यांच्या सूचनेवरून खानदेशातील नावरा-नावरी आश्रमाचे ते प्रमुख म्हणून होते परंतु तेथेही त्यांचे मन रमले नाही तेव्हा त्यांनी तेथून पलायन केले.

धुळे येथे 'शारदा मंदिर' या संस्थेच्यावतीने ७ सप्टेंबर १९४५ रोजी गुरुजींचा सत्कार करण्यात आला. यावेळी 'साने गुरुजी : व्यक्ती आणि वाङ्मय'या ग्रंथाचे प्रकाशन झाले. एरंडोल व गडखांब येथे सभाबंदीचा हुकूम मोडून भाषण केल्याबद्दल १७ ऑक्टोबर १९४५ रोजी गुरुजींना मनमाड येथे अटक केली आणि जळगावच्या तुरुंगात त्यांची रवानगी केली व २२ ऑक्टोबर १९४५ रोजी त्यांची जामिनावर सुटका करण्यात आली.

गुरुजींच्या कार्याचा गौरव महाराष्ट्रात ठिकठिकाणी झाला. त्यांच्या ४६ व्या वाढदिवसानिमित्त जळगाव येथे आचार्य विनोबा भावे यांच्या अध्यक्षतेखाली २४ डिसेंबर १९४५ साली त्यांचा सत्कार करण्यात आला. खानदेशाच्या जनतेच्या वतीने त्यांना १५ हजार रुपयांचा निधी अर्पण करण्यात आला. १४ नोव्हेंबर १९४६ साली महाराष्ट्राच्या वतीने सेनापती बापट यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईत सत्कार करण्यात आला व त्यांना एक लाखाची थैली अर्पण करण्यात आली.

२४ डिसेंबर १९४६ रोजी पुण्यात भरलेल्या कुमार साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद गुरुजींना देणेत आले. या समारंभात 'कुमारांचे गांधी' अशा बिरुदाने त्यांचा सन्मान करण्यात येऊन एक हजार रुपयांची गुरुदक्षिणा त्यांना अर्पण करण्यात आली.

साने गुरुजींनी एका महत्त्वाच्या सामाजिक प्रश्नावर केलेले उपोषण म्हणजे पंढरपूरचे विठ्ठल मंदिर हरिजन बांधवांसाठी खुले करणे. गुरुजींच्या आयुष्यातील ही चित्तवेधक अशी घटना होती. विविध प्रकारे सामाजिक जागरण व आवाहन करूनही हरिजनांना विठ्ठल मंदिर खुले होईना तेव्हा १

मे, १९४७ रोजी गुरुजींनी पंढरपूर येथील तनपुरे महाराजांच्या चारी धाम मंडपात प्राणांतिक उपोषण सुरू केले. बरेच आढेवेढे घेत हरिजनांसाठी मंदिर खुले करण्याचा निर्णय ट्रस्टी मंडळाने घेतल्यानंतर दि. १० मे, १९४७ रोजी रात्री ८.३५ वाजता गुरुजींनी उपोषण सोडले.

महात्मा गांधींच्या हत्त्येचे प्रायश्चित्त म्हणून गुरुजींनी २१ दिवसांचे उपोषण १ फेब्रुवारी १९४८ ते २१ फेब्रुवारी १९४८ या कालावधीत केले. 'जातीयता नष्ट करा' हा संदेश या उपोषण काळात त्यांनी दिला. उपोषण काळात ११ फेब्रुवारी १९४८ रोजी त्यांनी 'कर्तव्य' हे सायंदैनिक मुंबईस सुरू केले. ते चार महिने चालले.

याच फेब्रुवारी महिन्यात काँग्रेसने सेवा दलावर नियंत्रणाची कारवाई केली. गुरुजींनी तिला विरोध केला व 'राष्ट्र सेवा दल' काँग्रेसपासून अलग केले. प्रकाश मोहाडीकर व सहकारी यांनी सुरू केलेल्या 'प्रदीप' या मासिकाचे काही काळ त्यांनी संपादन केले.

१५ ऑगस्ट १९४८ रोजी त्यांनी 'साधना' साप्ताहिक सुरू केले. त्यासाठी त्यांनी स्वतंत्र छापखाना घातला. याच दिवशी 'साधना प्रकाशन' ही सुरू केले. त्याद्वारे गुरुजींनी लिहिलेल्या 'बापूजींच्या गोड गोष्टी' (भाग एक), 'साक्षरतेच्या कथा', 'दारूबंदीच्या कथा' इत्यादी पुस्तके प्रकाशित झाली. 'साधने' तूनच त्यांनी पुतणी सुधा हिला ११ जून १९४९ ते १० जून १९५० या कालावधीत लिहिलेली 'सुंदर पत्रे' क्रमश: प्रकाशित झाली.

१४ मे १९४९ रोजी आचार्य शं.द. जावडेकर यांच्या अध्यक्षतेखाली पुण्यात मराठी साहित्य संमेलन सुरू झाले. या निमित्ताने साहित्य संमेलनात गुरुजींनी प्रथमच सहभाग घेतला. संमेलनाचे अध्यक्ष आचार्य शं.द. जावडेकर हे होते.

जावडेकरांविषयी गुरुजींना आदर तर होताच पण त्यांचे विचारही गुरुजींच्या विचारांशी मिळतेजुळते होते. जावडेकर संमेलनाचे अध्यक्ष झाले याचा गुरुजींना आनंद झाला. संमेलनाबद्दल त्यांनी साधनेत लेखनही केले. संमेलनात गुरुजींनी 'आंतरभारती' चा ठराव मांडला. या ठरावास द.वा. पोतदार यांनी अनुमोदन तर दिलेच पण त्यांनी त्याचे समर्थनही केले. या ठरावामुळे गुरुजींच्या 'आंतरभारती' च्या कल्पनेला खूपच प्रसिद्धी मिळाली आणि महाराष्ट्रात स्वागतही झाले.

ते म्हणत 'अखंड भारत' अशी आपण घोषणा देतो परंतु भारताची आपणास काहीच माहिती नाही. त्यासाठी भारतातील सर्व प्रांतातील भाषा, संस्कृती, वाङ्मय जेथे एकत्र आणता येईल, जेथे भारताचे ऐक्य शिकविले जाईल व अनुभवता येईल अशी संस्था काढावी असे त्यांच्या मनात होते. मदतीसाठी गुरुजींकडे अनेकांनी विचारणाही केली; पण 'आंतरभारती' चा संकल्प अपुराच राहिला.

१९४९ च्या जून महिन्यात थायरॉईड ग्लॅन्ड्सच्या त्रासामुळे गुरुजींवर मुंबईत शस्त्रक्रिया केली. २६ ऑक्टोबर १९४९ रोजी मुंबई सरकारने शिक्षक-विद्यार्थ्यांच्या स्वातंत्र्यावर बंदी घालण्याचे

फर्मान काढले. त्याचा निषेध म्हणून गुरुजींनी प्राणांतिक  उपोषणाची घोषणा केली. शेवटी सरकारने २२ डिसेंबर १९४९ रोजी फर्मान मागे घेतले.

९ जून १९५० रोजी मेघा भुवन, मुंबई येथे दुपारच्या सुमारास गुरुजींनी झोपेच्या गोळ्या घेतल्या. के.ई.एम. इस्पितळात त्यांच्यावर उपचार करण्यात आले पण ते निरर्थक ठरले. दि. ११ जून १९५० रोजी पहाटे ४.३० वाजता साने गुरुजींची प्राणज्योत मालवली. गुरुजींच्या निधनाने सारा महाराष्ट्र हळहळला.

सुमारे १२५ पुस्तके लिहून गुरुजींनी मराठी साहित्याचे दालन संपन्न केले. गुरुजींचे साहित्य त्यांच्या प्रेमळ, ऋजु, सहिष्णु, वत्सल, करुणामय आणि सात्विक व्यक्तिमत्त्वाचा आविष्कार आहे. त्यांच्या साहित्याने बालमनांना हळुवारपणे फुलवीत संस्कारांचा गंध दिला, तरुण मनांना प्रेरणा देत त्यांची राष्ट्रभावना जागविली, आणि प्रौढांना अंतर्मुख करीत सत्वशीलतेकडे वळविले. त्यांनी साऱ्या समाजाला भारतीयत्वाचे, आपल्या संस्कृतीच्या महानतेचे आणि अस्मितेचे भान दिले.

गुरुजींचा जीवनविषयक दृष्टिकोन विशाल आणि व्यापक होता. अवघा भारतीय समाज कसा असावा, कसा नांदावा, उद्याचा भारत, उद्याचा तरुण कसा असावा याची आपल्या मनातील चित्रे गुरुजींनी आपल्या कथा–कादंबऱ्यांतून रेखाटली.

मराठी साहित्यात  प्रेमकथांना उधाण आले होते. त्यावेळी गुरुजींनी आपल्या कथा–कादंबऱ्यांमधून आपला देश, समाज, युवक, मानवता, समानता याबद्दलचे चिंतन प्रकट केले. त्यांनी कथा, कादंबऱ्या, कविता, पत्रे लिहिली, साप्ताहिके चालवली व याच माध्यमांतून मराठी वाचकाला गुरुजींनी मानवतेची हाक दिली. 'बलसागर भारत होवो' हे गुरुजींचे लाडके स्वप्न होते.

साने गुरुजींनी आपल्या व्यक्तिमत्त्वाचे दर्शन त्यांच्या साहित्यातून प्रकट केले आहे. श्यामची आई, श्याम, जीवनकलह अर्थात श्याम, खंड २ (धडपडणारा श्याम), जीवनविकास अर्थात श्याम, खंड ३ अशा चार आत्मकथनपर कादंबऱ्यांचे लिखाण केले. बहुतांशी लेखकांच्या मते 'साने गुरुजी' ही कादंबरी आहे. चंद्रकांत बांदिवडेकर, श.रा.राणे व गोपीनाथ तळवळकर यांनी 'श्यामची आई' कादंबरी असेच म्हटले आहे तर काहींनी आत्मचरित्रपर कादंबरी असे म्हटले आहे. मात्र या कादंबरीतील प्रकरणांना गुरुजींनी 'रात्र' असे म्हटलेले आहे. कारण गुरुजींनी आपल्या आईच्या आठवणी अमळनेरच्या छात्रालयातील विद्यार्थ्यांना आणि नाशिकच्या तुरुंगातील राजबंद्यांना दर रात्री एक याप्रमाणे सांगितल्या. 'श्यामची आई' मध्ये अशा बेचाळीस रात्री आहेत. त्यापैकी ३६ रात्री त्यांनी नाशिकच्या तुरुंगात असताना अवघ्या ५ दिवसात (गुरुवार, दि. ९ फेब्रुवारी ते सोमवार दि. १३ फेब्रुवारी १९३३ पर्यंत) लिहून काढल्या.

तुरुंगातील दिवसाचे काम आटोपून गुरुजी रात्री या आठवणी सांगत आणि लिहीत. गुरुजींनी या प्रकरणांना रात्री म्हणण्याचे हेच एक कारण आहे. आधी लिहिलेल्या ३६ रात्रींमधील तीन रात्री गुरुजींनी वगळल्या आणि उरलेल्या ९ रात्री त्यांनी तुरुंगातून बाहेर आल्यानंतर लिहिल्या. श्यामच्या या सर्व आठवणी त्यांच्या मित्रांना खूप आवडल्या. त्यांच्या प्रेमळ आग्रहावरूनच 'श्यामची आई' हे पुस्तक तयार झाले.

सुरुवातीला 'शालापत्रक' मासिकातून भागश: आणि नंतर या आठवणी पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाल्या. त्यावेळी गुरुजींनी कुणाचे तरी ३५ रुपयांचे देणे होते ते फेडण्यासाठी त्यांनी या पुस्तकाचे हक्क अत्यंत कमी पैशात पुणे विद्यार्थीगृहाला कायमचे देऊन टाकले. व्यवहार करून परतल्यावर गुरुजी आपल्या सहकाऱ्यांना म्हणाले, ''देणे फेडण्यासाठी आज मी माझ्या आईला विकून आलो.''

१९३५ साली ही कादंबरी प्रकाशित झाली. थोड्याच दिवसांत सर्वत्र या कादंबरीविषयी लोकांमधून प्रसिद्धीही मिळाली. कादंबरी प्रकाशित झाल्यापासून गेल्या ७४ वर्षांत तिची तिसरी आवृत्ती व ५४ पुनर्मुद्रिते प्रकाशित झाली. यावरून 'श्यामची आई' ही कादंबरी वाचकांना किती आवडली, हे स्पष्ट होते.

गुरुजींनी या कादंबरीला 'पवित्र पुस्तक' असे म्हटले आहे. त्याचे स्पष्टीकरण देताना गुरुजी म्हणतात, ''हे पुस्तक सुंदर, सुगंधी व सुरस आहे की नाही, ते मला माहीत नाही परंतु पवित्र आहे असे मी विनयाने म्हणू शकतो. हृदयातील सारा जिव्हाळा येथे ओतलेला आहे. या गोष्टी लिहीत असताना माझे डोळे शतवार ओले झाले होते. पुष्कळांना असे वाटेल, की या श्यामच्याच गोष्टी आहेत; पण या साऱ्या गोष्टींतून शेवटी मातेचे प्रेमच बाहेर पडलेले दिसेल. झाडाच्या साऱ्या फांद्या-पानांचा विस्तार, वर येणाऱ्या दहा-वीस फुला फळांसाठीच असतो. त्याप्रमाणे माझ्या हृदयात मातेबद्दलच्या असणाऱ्या प्रेम, भक्ती व कृतज्ञता यांच्या अपार भावना 'श्यामची आई' वाचून जर वाचकांच्या हृदयातही उत्पन्न होतील, तर हे पुस्तक कृतार्थ झाले, असे म्हणता येईल. हे पुस्तक वाचून वाचकांचे डोळे व हृदयेही जर कोरीच राहिली, तरच हे पुस्तक त्याज्य, व्यर्थ व नीरस समजावे.

मातृप्रेमाचे माहात्म्य आणि मातेची महती त्यांनी 'श्यामची आई' कादंबरीतून दाखवून दिली आहे. आईने श्यामला प्रतिकूल परिस्थितीतसुद्धा कसे घडविले, लहान-लहान प्रसंगांतून त्याच्या मनावर झालेले संस्कार हाच या पुस्तकाचा मुख्य विषय आहे.

श्याम हा इतर मुलांसारखाच होता त्याप्रमाणे वेगळाही होता. तो हट्टी, भांडखोर होता, काहीसा मत्सरीही पण त्याचप्रमाणे तो तल्लख बुद्धीचाही होता. अत्यंत भावनाशील होता. काही

वेळा त्याच्या भावना अत्यंत तीव्रही बनत असत. परिस्थितीमुळे बालवयातही जे प्रौढत्व येते ते श्यामच्याही ठिकाणी आलेले होते.

या सर्व गुणावगुणांवर श्यामच्या आईचा वत्सल हात फिरत गेला. अवगुण कमी होत गेले आणि गुण फुलत गेले. बालपणी आईकडून मिळालेले उदंड प्रेम आणि शुभ संस्कार त्याच्या आयुष्यभर पुरले. त्याच्या आईने श्यामवर श्रेष्ठ मूल्यांचे संस्कार केले.

तिने श्यामला जगाकडे प्रेमळपणे बघायला, माणसांशी प्रेमळपणे बोलायला शिकविले. गाई- गुरांवर, फुला-पाखरांवर, झाडा-माडांवर प्रेम करायला शिकविले. अत्यंत कष्ट होत असतानाही तोंडातून 'ब्र' न काढता शक्यतो आपले काम उत्कृष्टपणे करीत राहणे हे मला तिनेच शिकविले. कोंड्याचा मांडा करून कसा खावा व दारिद्र्यातही स्वत्व व सत्त्व न गमविता कसे राहावे, हे तिनेच मला शिकविले. ते आईविषयी म्हणतात, ''माझ्यात जे काही चांगले आहे, ते माझ्या आईचे आहे. आई माझा गुरू, आई कल्पतरू !''

मुलांनो, श्यामला त्याची जडणघडण होत असताना त्याच्य आईने मौलिक विचार दिले. सावित्री व्रताच्या दिवशी श्यामची आई हिवतापाने आजारी पडली. तिने आपल्याऐवजी श्यामला वडाला प्रदक्षिणा घालायला सांगितले; 'पण माझ्या प्रदक्षिणा कशा चालतील ?' अशी सबब श्यामने सांगितली. त्याला लाज वाटत होती म्हणून तो तयार होईना.

तेव्हा आई त्याला म्हणाली, ''तू म्हणजे मीच नाही का ? अरे तू माझेच रूप. मी आजारी आहे हे देवाला माहिती आहे... श्याम, आईचे काम करावयास कसली रे लाज... देवाचे काम करावयास लाजू नये, पाप करावयास माणसाने लाजावे... नसलास जाणार तर मी जाईन हो. हे ऐकून आईचे शब्द श्यामच्या मनात खोल गेले. तो जायला तयार झाला.

रोज शाळा सुटल्यावर मुले फुले गोळा करायला जात. एके दिवशी गुलबक्षीचे घुबे म्हणजेच न फुललेल्या कळ्याही श्याम तोडून घेऊन आला व त्या पाण्यात घालून ठेवल्या; पण पाण्यात ठेवूनही दुसऱ्या दिवशी कळ्या फुलल्या नाहीत. तेव्हा इतर मुलांनी श्यामच्या आईजवळ तक्रार केली. आईने सारे ऐकून घेतले व मुलांना फुले परत केली. त्यावेळी श्यामला आई म्हणाली, ''श्याम ! दुसऱ्या घरची फुले त्यांना न सांगता – सवरता आणू नयेत. त्यांना विचारून आणावी. अशी मुकी फुले (कळ्या) तोडणे हे वाईट काम.'' ती म्हणाली, ''तू अधीर झालास; पण पदरात काहीच पडले नाही. अर्धवट कामे नीट फुलत नाहीत, फळत नाहीत'' हा बोध त्याला मिळाला.

एकदा न्हाणीत आंघोळ झाल्यावर पायांना माती लागू नये म्हणून श्यामने आईला तळवे पुसायला सांगितले. आईने आपल्या ओच्याने त्याचे पाय पुसले व लुगडे ओले करून घेतले. देवघरात गेल्यावर आई निरांजने घेऊन आली व श्यामला म्हणाली, ''श्याम, पायाला घाण लागू नये म्हणून जपतोस ! तसाच मनाला घाण लागू नये म्हणून जप हो !''